Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 11 October 2026

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

**प्रादेशिक बातम्या**

दिनांक ११ ऑक्टोबर २०२६ सकाळी ११.०० वाजता

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज तामिळनाडुतल्या चेन्नईच्या दौ-यावर आहेत,त्यांच्या हस्ते आज जवळपास १३ हजार कोटी रुपयांच्या जनकल्याणकारी योजनांचं उद्घाटन-लोकर्पण होत आहे.मेट्रो रेल्वेला रवाना करण्यासह तामिळनाडुचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्यासोबत ते मेट्रो यात्राही करणार आहेत. रेल्वे सेवांशी निगडीत विविध योजना ज्यामध्ये  अमृत भारत स्टेशन योजनेचा समावेश आहे त्यांचही लोकर्पण पंतप्रधान करतील. यासह पोरूर तळ्यानजिकच्या जलकंठेश्वर मंदिरातही दर्शनासाठी पंतप्रधान् जाणार आहेत.

***

राज्यात साडेतीन शक्तिपीठांच्या मंदिरांसह ठिकठिकाणच्या देवींच्या सर्वच मंदिरांमध्ये आजपासून शारदीय नवरात्रौत्सवाला भक्तीभावात प्रारंभ झाला. देवीचा जयघोष करत कोल्हापूरची श्री महालक्ष्मी अंबाबाई, तुळजापूरची श्री तुळजाभवानी, माहूरची श्री रेणुकामाता आणि वणीची श्री सप्तशृंगी देवी या साडेतीन शक्तिपीठांमध्ये विधिवत घटस्थापना झाली आहे. सर्वच मंदिरांना विद्युत रोषणाई आणि फुलांची सजावट करण्यात आली आहे. देवीची विविध रूपांत पूजा, आरती आणि धार्मिक कार्यक्रमातून पुढचे नऊ दिवस आदिशक्तीचा जागर केला जाणार आहे. घराघरातही आज पारंपरिक पद्धतीने घटस्थापना करण्यात येत आहे. शारदीय नवरात्रौत्सववाच्या निमित्ताने राज्यभरात अनेक सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रम होत आहेत.

***

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवरात्रोत्सवाच्या देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत.देवीचा दिव्य आशिर्वाद सर्व देशवासीयांमध्ये धैर्य आणि आत्मविश्वासाच्या भावनेला प्रेरीत करेल अशी मनोकामना असल्याचं त्यांनी आपल्या संदेशात नमूद केलं.

***

कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके ,आशुतोष रांका आणि सौरव दास यांना आज विशेष कार्यकारी दंडाधिका-यांनी सशर्त सुटका केली.आज थोड्यावेळापूर्वीच कॉकरोच जनता पक्षाच्या कथित निषेध आंदोलनाविषयी दक्षिण दिल्लीत छावनी पोलिस स्थानक परिसरातील न्यायालयात झालेल्या सुनावनीदरम्यान हे निर्देश  देण्यात आले. या तिघांनी पुढील वर्षभर शांततेचा तसंच कायदा आणि सुव्यवस्थेचा  भंग होईल अशा कोणत्याही कृत्यात सहभागी न होण्याची अट न्यायालयातर्फे घालण्यात आली आहे.

***

जलसुरक्षेसाठी पाण्याचे योग्य नियोजन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक असल्याचं केंद्रीय जलशक्ती राज्यमंत्री डॉ. राज भूषण चौधरी यांनी म्हटलं आहे. पुण्यात हिंजवडी इथं आर्यन्स ग्रुपतर्फे आयोजित तीन दिवसीय 'एडब्ल्यूटीआयएस 2026' या तंत्रज्ञान आणि नवकल्पनाविषयक राष्ट्रीय परिषदेच्या समारोपात ते बोलत होते. देशाच्या विकासासाठी तंत्रज्ञान, नवकल्पना आणि लोकसहभाग यांची सांगड घालण्यावर त्यांनी भर दिला. कृत्रिम बुद्धिमत्ता, हरित ऊर्जा आणि जलव्यवस्थापनातील नवकल्पना भारताला आत्मनिर्भरतेकडे नेतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

***

महाराजा अग्रसेन यांची आज जयंती.यानिमित्त पंतप्रधान मोदी यांनी त्यांनी आदरांजली अर्पण केली आहे.सामाजिक सोहार्दता आण्इ नागरी सेवांचे अग्रणी असलेल्या महाराजा अग्रसेन  यांचा जिवन चरीत्र आणि विचार समाजाला मानवतेची निरंतर शिकवण देत असल्याचं आपल्या संदेशात म्हटलं आहे. लोकनायक जयप्रकाश नारायण यांचीही आज जयंती आहे.

यानिमित्त संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जयप्रकाश नारायण यांना सामाजिक संपर्क माध्यमातील संदेशातून आदरांजली अर्पित केली आहे.

***

पुण्यातील एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन अद्याप सुरू आहे. एस. एम. जोशी पूल आणि नवी पेठ परिसर आंदोलनाचं प्रमुख केंद्र बनले आहेत. सलग उपोषणामुळं प्रकृती खालावल्याने तीन विद्यार्थ्यांनी वैद्यकीय सल्ल्यानुसार उपोषण मागं घेतलं. मात्र, इतर विद्यार्थ्यांचा आपल्या मागण्यांसाठीचा सत्याग्रह सुरूच आहे. दरम्यान, या आंदोलन प्रकरणी पुणे पोलिसांनी १५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

***

राज्यात विशेष सखोल पुनरीक्षणांतर्गत मतदार यादीत नाव समाविष्ट करणं, वगळणं किंवा दुरुस्ती करण्यासाठी उद्यापर्यंत अंतिम मुदत आहे. नवमतदारांसह यादीत नाव नसलेल्या पात्र नागरिकांसाठी आजही विशेष शिबिरं आयोजित करण्यात आली आहेत.

***

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा ,आणि त्यांना अटक करावी ,या मागणीसाठी डाव्या पक्षांच्या वतीनं काल छत्रपती संभाजीनगर इथं आंदोलन करण्यात आलं .या आंदोलनात भारतीय कम्युनिस्ट पक्ष , मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष ,काँग्रेस ,स्वराज अभियान यांच्यासह विविध संघटनांच्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेत घोषणाबाजी केली.

****

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात तिसरा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना इंदूर इथं आज संध्याकाळी सात वाजता होणार आहे. पाच सामन्यांच्या मालिकेतल्या दोन्ही संघांनी प्रत्येकी एक विजय मिळवत बरोबरी साधली असल्यानं मालिकेतली चुरस वाढली आहे.
आणि सामान्य परिस्थिती पुन्हा प्रस्थापित होईल, अशी आशाही भारतानं व्यक्त केली आहे.

***

मुंबईसह कोकण, तसंच विदर्भासह राज्यातल्या काही भागांत उद्या, सोमवारपर्यंत उष्णतेची लाट येण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. अनेक शहरांमधलं तापमान ३७ ते ४० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याची शक्यता असून, ऑक्टोबर हिटमुळे आरोग्याच्या समस्या वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

****